# University of Mumbai

परीक्षा विभाग/अभि.निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८

क्र.परीक्षा/अभि.निकाल/३eч/२०१५

परिपत्रक :—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, रत्नागिरी उपकेंद्राचे समन्वयक व ठाणे उपकेंद्राचे मानद सल्लागार यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र.परीक्षा/विज्ञान/३९२४/२०१४ दि. १५ डिसेंबर, २०१४ अन्वये अभियांत्रिकी (Engg.) व एम.सी.ए. या अभ्यासक्रमांचे प्रथम सत्र – २०१५ (मे २०१५) मध्ये होणाऱ्या परीक्षांचे परीक्षा अर्ज Online स्विकारण्यात येणार असून याबाबत लवकरच परिपत्रक निर्गमित करण्यात येईल असे कळविण्यात आले होते;

यानुसार अभियांत्रिकी विद्याशाखेच्या विद्यापीठ घेत असलेल्या पदवी (B.E.) सत्र–१ व २ व सत्र–७ व ८ या सत्रांचे परीक्षा अर्ज muexam.in/exam-form/ या संकेतस्थळावर ‘ Engineering Exam Form Student's login’ या शिर्षाखाली उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. (Click on - Engineering Exam Form Student's login )

तरी प्रथम सत्र – २०१५ (मे २०१५) होऊ घातलेल्या वर नमुद केलेल्या अभियांत्रिकीच्या सत्र–१ व २ व सत्र–७ व ८ या सत्रांच्या परीक्षांसाठी प्रविष्ठ होणाऱ्या नियमित (Regular) पुर्नपरीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज Online भरण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे :—

| परीक्षा शुल्क | विद्यार्थ्यांने Online अर्ज भरण्याची व महाविद्यालयात त्याची प्रिंट सादर करण्याची तारीख | महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज Inward करण्याची तारीख | महाविद्यालयाने Form submission Report व विहित फी विद्यापीठात जमा करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित फी | १२ फेब्रु. ते २७ फेब्रु.२०१५ | १६ फेब्रु. ते ३ मार्च, २०१५ | ५ मार्च, २०१५ पर्यंत |
| विलंब शुल्क रू. १००/— | २ मार्च ते ७ मार्च, २०१५ | ४ मार्च ते १० मार्च, २०१५ | १२ मार्च, २०१५ पर्यंत |
| अतिविलंब शुल्क रू. ५००/— | ९ मार्च ते १३ मार्च, २०१५ | ११ मार्च ते १७ मार्च, २०१५ | २० मार्च, २०१५ पर्यंत |

पुढे संबंधीतांना असेही कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशिलाप्रमाणे— संबंधीत विद्यार्थ्यांनी आपले परीक्षाअर्ज muexam.in/exam-form/ या संकेतस्थळावर Online भरून त्याची प्रिंट घेऊन आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात जमा करावेत व संबंधीत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी Online भरलेले परीक्षाअर्ज आपल्या Login मध्ये Inward करून घ्यावेत व सदर Inward झालेल्या परीक्षाअर्जांचे Form Submission Report काढून तो Report व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावेत. पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही. तसेच परीक्षा अर्जांच्या प्रती (Examination Form Prints) विद्यापीठाकडे पाठवू नयेत.

**मात्र अभियांत्रिकी विद्याशाखेच्या पदव्युत्तर पदवी (M.E.) या परीक्षेचे परीक्षा अर्ज पारंपारिक पद्धतीप्रमाणे (Hard Copy स्वरूपात) स्विकारण्याचे ठरले आहे. तरी हया परीक्षेचे अर्जसुध्दा वर नमुद केलेल्या तारखांप्रमाणे स्विकारण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.**

वरील सर्व बाबींची संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

(दिनेश भोंडे)
परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. १२ फेब्रुवारी, २०१५.

प्रति,

प्राचार्य सर्व संलग्नीत महाविद्यालये व संचालक/प्रमुख, मान्यताप्राप्त संस्था